महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
क्रमांक : १०/एनजीपी/हिवाळी सुट्टी/२०२०/ ९१८ दिनांक : - 9 NOV 2020

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी सुट्टी बाबत....
संदर्भ: संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्रमांक : मरातंशिमं/का-५०/२०२०/५७, दिनांक : ६.११.२०२०.

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी २० दिवस हिवाळी सुट्टी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाज व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताच्या प्रवेश प्रक्रियेकरिता लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून दि.११.११.२०२० ते ३०.११.२०२० पर्यंत एकूण २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात यावी.

तसेच परीक्षा, मंडळस्तरावरील कामकाज, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताच्या प्रवेश प्रक्रियेच्या तातडीच्या व महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल ते उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून सदर कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताच्या प्रवेश प्रक्रियेच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदर सुट्टी २० दिवसापेक्षा जास्त असु नये.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

---

पृष्ठांकन पत्र क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/ 2049 दिनांक : 11 NOV 2020

प्रत : सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका/ संस्था, औरंगाबाद विभाग यांना देऊन कळविण्यांत येते की, उपरोक्त परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी सुट्टी बाबत कार्यवाही करावी.

**( महेश शिवणकर )**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.